# प्रत्येक कृतीत प्रेम २०२०!

## गुरुमाई चिद्विलासानंद

### परिचय : लीलावती स्टुअर्ट

ते काय आहे जे तेव्हापासून मला आधार देत राहिले आहे, जेव्हा अनेक वर्षांपूर्वी माझ्या आईने सिद्धयोगाशी माझा परिचय करवून दिला? श्रीगुरूंचे प्रेम. माझ्या अंतरात काहीही जरी घडत असले, माझ्या मानसपटलावर काहीही जरी सुरू असले, आणि माझ्या सभोवतालच्या वातावरणात काहीही जरी घडत असले, तरीदेखील श्रीगुरूंचे प्रेम हे नित्य-उपस्थित असते— माझ्या हृदयाच्या निरंतर सुरू असलेल्या ठोक्यांप्रमाणे. जे काही घडते आहे, त्याला मी उत्थानकारक मानत असो किंवा नसो, घडणाऱ्या गोष्टींकडे मी सकारात्मक दृष्टीने पाहत असो किंवा नसो, जे काही घडते आहे ते मला श्रेष्ठ वाटत असो किंवा नसो, त्यामध्ये प्रेमाचा स्पंद हा सदैव असतोच; तो सातत्याने स्पंदित होत राहतो. भारतीय शास्त्रीय संगीतात जसा ताल असतो आणि जो संगीताच्या वाजवल्या जाणाऱ्या एखाद्या तुकड्याशी अगदी अनुरूप असतो [चार मात्रांचा ताल, सहा मात्रांचा ताल, सोळा मात्रांचा ताल, इत्यादी] — किंवा पाश्चात्त्य संगीतामध्ये, ज्या प्रकारे निरनिराळे मीटर असतात [ट्रिपल टाइम, कॉमन टाइम, कंपाउंड टाइम] — श्रीगुरूंच्या प्रेमाचीदेखील स्वतःचीच एक अनोखी लय असते. स्पंदित होण्याची त्याची स्वतःचीच एक रीत असते. आणि मी ही लय ऐकू शकते. मी ती अनुभवते. ती मधुर आहे. ती दिलासादायक आहे. ती मला माझ्या स्रोताकडे आकृष्ट करते, जिथे मी सद्गुणांना जिवंत होताना अनुभवते.

श्रीगुरूंच्या प्रेमाचे नित्यनवीन अमृत, जे मला सतत पोषित करत असते, त्याच्याप्रति मी कृतज्ञ आहे आणि कृतज्ञतेच्या याच भावासह मला 'संत व्हॅलन्टाइन् डे'च्याप्रीत्यर्थ श्रीगुरुमाईंच्या परादृष्टीचा आणि त्यांच्या रचनेचा, त्यांच्या शिकवणींचा परिचय करून देताना अतिशय आनंद होतो आहे : 'प्रत्येक कृतीत प्रेम २०२०'.

अनेकदा मी पाहिले आहे की, गुरुमाईंच्या शिकवणी आपल्या *सर्वांसाठी* प्रसंगोचित असतात. आपल्या सर्वांची व्यक्तिमत्त्वे कितीही जरी भिन्न-भिन्न असली, आपले दृष्टिकोन आणि आपली मते कितीही जरी भिन्न-भिन्न असले, आपल्या परिस्थिती, आपली पदे-प्रतिष्ठा, आपला सामाजिक स्तर कितीही जरी भिन्न असला—आपल्या दरम्यान कितीही भिन्नता जरी असल्या— जेव्हा आपण गुरुमाईंच्या शिकवणींना आपल्या हृदयात उतरवतो, तेव्हा त्या शिकवणी आपल्याला प्रेमाच्या अनुभवापर्यंत घेऊन जातात.

श्रीगुरुमाईंच्या शिकवणी चैतन्याने स्पंदित आहेत; त्या श्रीगुरूंच्या शक्तीने अनुप्राणित आहेत. त्यांच्यात ज्ञान चमचमते. त्यांमध्ये प्रज्ञान खोलवर सामावलेले आहे. या शिकवणींमुळे अशा अंतर्दृष्टी उदित होतात की, ज्यांमुळे आपली जागरूकता त्या खजिन्याकडे वळते, जो आपल्याला आशीर्वादस्वरूपात प्राप्त झाला आहे. त्या आपल्याला जन्मजन्मांतरीच्या अज्ञानाला दूर सारण्याचे प्रयास करण्याची आणि आत्म्याच्या प्रकाशाशी मैत्री करण्याची प्रेरणा देतात. मी असे अनुभवले आहे की, आपल्यासमोर जी परिस्थिती असते तिच्यासाठी गुरुमाईंच्या शिकवणी अगदी समर्पक असतात आणि आपल्या परम लक्ष्यापर्यंत म्हणजेच मोक्षापर्यंत पोहोचण्यासाठी त्या सदैव आपल्याला आधार प्रदान करतात.

माझ्या हे लक्षात आले आहे की, एक सर्वात लाभदायक कृती जी मी स्वतःसाठी करू शकते, ती म्हणजे याची खात्री करून घेणे की, श्रीगुरुमाईंच्या शिकवणींवर मननचिंतन करण्यासाठी मी स्वतःला वेळ द्यावा. प्रत्येक दिवशी, मी श्रीगुरुमाईंच्या शिकवणींना माझ्या जीवनात उतरवण्याच्या पद्धती शोधते. ही माझ्यासाठी जीवन जगण्याची अतिशय सुखकारक रीत बनली आहे. श्रीगुरुमाईंच्या वचनांवर मी ज्या-ज्या वेळी मननचिंतन करते, त्यांच्या शिकवणींमधून मी जे शिकले आहे ते आचरणात आणण्याचा प्रयत्न मी ज्या-ज्या वेळी करते, त्या-त्या वेळी मला असे वाटते की, मी एका शीतल आणि शांत जलाशयात डुंबते आहे. माझी समज ताजीतवानी होते. माझा दृष्टिकोन पुन्हा नवीन होतो. माझे विचार उन्नत होतात. मी आनंदाने ओतप्रोत होते. मला सुरक्षित, प्रेरित व शांत वाटते. श्रीगुरुमाईंची प्रत्येक शिकवण मला हे जाणण्याचे बळ देते की, जी कोणतीही दुःखे आणि

यातना मी अनुभवत असेन, ते माझ्यासाठी प्रेमाची कवाडे उघडतील. एखाद्या क्षणी, मला जर खिन्नता जाणवत असेल किंवा एखाद्याने मला खूप त्रास दिला आहे असे वाटत असेल, तेव्हा मला माहित असते की, प्रेम मला प्रफुल्लित ठेवेल आणि ते मला ईश्वराच्या विशुद्ध स्वरूपाचे दर्शन करवून देईल.

श्रीगुरूंच्या प्रेमाप्रति माझा दृष्टिकोन हा आहे आणि तो तुम्ही वाचला यासाठी मी तुमची आभारी आहे. श्रीगुरुमाईंच्या 'प्रत्येक कृतीत प्रेम २०२०'चा परिचय करून देण्यासाठी माझा दृष्टिकोन मी तुम्हाला सांगितला, ज्याविषयी मी आता थोडे अधिक विस्तारपूर्वक सांगणार आहे.

'प्रत्येक कृतीत प्रेम २०२०' हे श्रीगुरुमाईंची धरणीमातेसाठी असलेली परादृष्टी दर्शवते. या सुंदर, सजीव, वर्णनात्मक पेंटिंगमध्ये पृथ्वीला दिलासा मिळतो आहे —ती पुन्हा नवीन बनते आहे, तिला नवजीवन मिळते आहे आणि तिच्यात संतुलन व सामंजस्य स्थापित होते आहे. अशा समयी की, जेव्हा या पृथ्वीचा बराचसा भाग काही घटकांच्या क्रूरतेपासून आणि रोगराईच्या अनिश्चिततेपासून मुक्तता शोधू पाहत आहे, तेव्हा हे पेंटिंग वाळवंटातील हिरव्यागार प्रदेशाचे चित्रण करते जिथे सर्वकाही सामंजस्याने कार्यरत आहे. हे ते वातावरण आहे ज्यामध्ये जीवनाची भरभराट होते, ज्यामध्ये संपूर्ण नैसर्गिक सौंदर्यात आणि स्वर्गीय प्राचुर्यात भगवंताचा मृदुल, रचनात्मक हस्त असल्याचे दिसून येते. इतर काहीही जरी अनुभवास येत नसले, तरीदेखील काही क्षण या पेंटिंगसमवेत घालवल्यानंतर, तुम्हाला स्वतःच्या मनाच्या गोंगाटापासून सुटका झाल्यासारखे वाटेल.

गुरुमाईंच्या शिकवणी, 'प्रत्येक कृतीत प्रेम'मधील चित्रांमध्ये [व्हिजुअल्स्]मध्ये जडवलेल्या आहेत; त्याचबरोबर जगभरातील अनेक महान ऋषिमुनींच्या व संतांच्या, लेखकांच्या आणि कवींच्या शिकवणी, म्हणी आणि नीतिवचनेदेखील यांमध्ये अंतर्भूत आहेत. गुरुमाईंनी निवडलेल्या सर्व शिकवणी प्रेम या विषयावर आहेत, या शिकवणी प्रेमाच्या अनेक पैलूंशी आणि त्याच्या व्याप्तींशी संबंधित आहेत आणि आपण जेव्हा प्रेमाला या जगात प्रकटरूप देतो, तेव्हा ते कसे दिसते याच्याशीदेखील या शिकवणी

निगडित आहेत. प्रत्येक शिकवणीसमवेत जे चित्र दिले आहे त्या चित्राच्या गुणांना ती विशिष्ट शिकवण जागृतदेखील करते, जसे की झाडेझुडुपे, पशू, रत्ने, मंदिराचा कळस. हे जग आपल्याला काय-काय देत असते आणि या चमचमत्या, स्पंदनशील ब्रह्मांडाकडून आपल्याला जे सर्वकाही शिकायचे आहे त्या सगळ्याचे स्मरण या शिकवणी आपल्याला करून देतात. पेंटिंग आणि शिकवणी, दोन्ही मिळून या गोष्टीचीदेखील झलक प्रदान करतात की, आपण या जगाला एका स्वर्गासमान उत्तम स्थळ कशा प्रकारे बनवू शकतो.

मला असे आढळले आहे की, 'प्रत्येक कृतीत प्रेम' हे प्रकट करते की, आपण या शिकवणी जेव्हा आपल्या दैनंदिन जीवनात कार्यान्वित करतो— जेव्हा या शिकवणींचा सुगंध आपण आपल्या अस्तित्वाच्या प्रत्येक पेशीत भिनवतो — तेव्हा त्याचे परिणाम तत्काळ होतात. आपल्यातील सर्वात उत्कृष्ट पैलूला प्रकट करून, आपल्या पृथ्वी ग्रहाच्या संरक्षणाची जबाबदारी घेऊन आणि त्याच्या वैभवाला पुन्हा प्रस्थापित करून, आपण पृथ्वीशी गहनतेने जोडले जाऊ शकतो. आपल्याला याचे आकलन होते की, जीवनाचा प्रत्येक क्षण हा वास्तवात एक अनमोल उपहार आहे. याच धरतीवर आपल्याला तो मार्ग सापडतो जो आपल्याला स्वतःच्या पावन गंतव्यस्थानापर्यंत घेऊन जातो. या पृथ्वीवर आपण शिकतो, की प्रेम कसे प्राप्त करावे तसेच आपण हे शिकतो की, प्रेमाच्या सर्व विभिन्न स्वरूपांमध्ये आपण त्याला कसे ओळखावे, त्याचा स्वीकार कसा करावा आणि त्याची अनुभूती करून त्याप्रति कृतज्ञ कसे राहावे. खरेच, ही पृथ्वी अत्यंत अद्‌भुत आहे. ती आपल्या अस्तित्वासाठी पोषक आहे. ती शांतिदायक आहे. सौंदर्यदृष्ट्या ती विस्मयपूर्ण आहे.

मी तुम्हाला गुरुमाईंच्या 'प्रत्येक कृतीत प्रेम २०२०'शी संलग्न होण्यासाठी वैयक्तिकरित्या आमंत्रित करू इच्छिते. मला आशा आहे की, असे करत असताना तुम्हाला या पेंटिंगमध्ये अंतर्भूत असलेल्या गहन प्रज्ञानाचे आकलन होईल. याशिवाय, आपण जेव्हा सामूहिकरित्या अशा एका जगाची कल्पना करतो ज्यामध्ये धरती, जलाशये तसेच समस्त जीवसृष्टी सुरक्षित आहे—

जेव्हा आपला संकल्प असतो,

मनोकामना असते,

परिकल्पना असते,

स्वप्न असते,

आणि प्रार्थना असते

की, ही संपूर्ण पृथ्वी

पोषित व्हावी आणि सुरक्षित राहावी,

तेव्हा यामुळे येणाऱ्या पिढीसाठी, त्याच्या पुढील पिढीसाठी आणि त्यानंतर येणाऱ्या सर्व पिढ्यांसाठी एक आदर्श स्थापित होईल. त्यांच्यापरीने सर्वश्रेष्ठ अर्पण करण्याची उच्च आकांक्षा ते बाळगतील. स्वतःला सर्वस्वीपणे वाहून घेण्याची उच्च आकांक्षा ते बाळगतील. तेदेखील 'प्रत्येक कृतीत प्रेम'चे मूर्तरूप बनण्याची उच्च आकांक्षा बाळगतील.

इतिहासात अनेकदा, मनुष्याने हे सिद्ध करून दाखवले आहे की, आपल्या प्रत्येकाच्या अंतरी विद्यमान असलेल्या त्या सकारात्मक ऊर्जेचा योग्य वापर आपण जेव्हा करतो, तेव्हा आपण खूप काही साध्य करू शकतो. आपण एकमेकांना प्रभावित करतो आणि आपण आपल्या वातावरणाला प्रभावित करतो. मी वाट पाहाते आहे तो बदल अनुभवण्याची, ज्याविषयी मी जाणते की मी तो तेव्हा अनुभवेन, जेव्हा विश्वातील शेकडोंच्या आणि हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या, तुम्हा सर्वांसमवेत मी 'प्रत्येक कृतीत प्रेम'चे अन्वेषण करीन. मी माझ्या मनात असे चित्र उदित होताना पाहते आहे की, आपण सर्वजण 'प्रत्येक कृतीत प्रेम'ला एकाच वेळी पाहत आहोत. मी माझ्या मनात असे चित्र उदित होताना पाहते आहे की, आपण सर्वजण श्रीगुरूंच्या करुणामय प्रेमासह समरस होत आहोत—आणि आपल्या प्रेमाच्या त्या अवस्थेपर्यंत पोहोचून आपण ते समस्त विश्वाला देत आहोत.



हृदय हे सर्व तीर्थक्षेत्रांचे केंद्र आहे. तिथे जा आणि विहार करा.

~ भगवान नित्यानंद



तुम्हाला जर प्रेमाची अनुभूती होत असेल, तर हे जाणून घ्या की, तुम्ही विशेष आहात.
तुम्ही जर विशेष आहात, तर हे जाणून घ्या की, तुम्ही प्रेम आहात.

~ गुरुमाई चिद्विलासानंद



जसा पृथ्वीखाली दबलेला खजिना,
आणि फळामध्ये अंतर्निहित स्वाद,
जसे शिळांमध्ये निहित स्वर्ण,

आणि तिळामध्ये दडलेले तेल,
जसे काष्ठामध्ये दडलेले अग्नीचे तेज,
त्याचप्रमाणे, हे चेन्नमल्लिकार्जुना,
हे मल्लिकापुष्पासमान श्वेत भगवंता,
तू परब्रह्म आहेस,
आणि अस्थिर मनोभावांमुळे झाकले गेलेले
तुझ्या अस्तित्वाचे माहात्म्य,
आकलनाच्या पलीकडे आहे.

~ अक्कमहादेवी, बाराव्या शतकातील भारतीय संतकवयित्री



माझीही वेळ नक्कीच येईल :
मला पंख पसरत असल्याची जाणीव होते आहे.

~ ओसिप मँडेलस्तम [१८९१-१९३८], रशियन कवी



ज्या दिवशी तुमचा जन्म झाला, त्याच दिवशी साऱ्या फुलांचा जन्म झाला.

~ मेक्सिकोचे पारंपरिक जन्मदिवस-गीत



नीलाकाशातून प्रकट होणारे
स्वर्गातील गंगेचे शुद्ध व पवित्र जल,
जे ब्रह्मांडाला दोन भागांमध्ये विभाजित करत असल्याप्रमाणे भासते,
जे भगवान शिवाच्या जटांमधून वाहते,
आणि मेरुपर्वताच्या दऱ्याखोऱ्यांतून तसेच वृक्षांमधून प्रवाहित होते—
ते प्रचंड धारांच्या रूपात पृथ्वीवर पडावे.
त्याने सर्वांचे दोष धुवून टाकावेत तसेच समुद्रतटाच्या बाहेर वाहावे.

देवनगरीमध्ये वाहणाऱ्या पावन नदीने,
देवी गंगेने, तिच्या आशीर्वादांचा आपल्या सगळ्यांवर वर्षाव करावा.

~आदि शंकराचार्य,
आठव्या शतकातील भारतीय वंदनीय ऋषी



या जगात जन्म घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी या जगाचा जन्म झाला आहे.
आणि यामध्येच निहित आहे तुमच्या सारतत्त्वाचे व उद्देशाचे रहस्य.
हे बालका, तू प्राचीन आहेस!
आणि जुने आहे हे जग ज्याला तू आत्ताच पाहतो आहेस!

~ जोवान्नी पास्कोली, [१८५५-१९१२]
प्रतिष्ठित इटालियन विद्वान आणि कवी



अश्रू प्रेमाची गाठोडी असतात.

~ हवाई द्वीप येथील लोकोक्ती



विलोची झाडे हिरवी असतात, त्यांची फुले असतात गर्द लाल.

~ जपानी म्हण



सिद्धनाथांनी जेव्हापासून माझे जीवन रूपांतरित केले,
तेव्हापासून माझ्यासाठी सर्वकाही नवीन झाले आहे.
माझे मन नवीन,
चंद्र नवीन,
सूर्य नवीन.
अवघे जग
टवटवीत आणि अगदी नवेनवेसे वाटते आहे,
जणूकाही पाण्याने स्वच्छ धुतले गेले आहे.
जेव्हापासून मी माझे मन आणि शरीर
सोऽहम्‌च्या साबणाने धुतले आहे,
मी नवीनच झाले आहे.
माझा कायापालट झाला आहे.

आता लल्ली ती महाशक्ती
बनली आहे
जी अत्यानंदाने नृत्य करते आहे.

~ लल्लेश्वरी, चौदाव्या शतकातील काश्मीरी संतकवयित्री
इंग्रजी भावार्थ : गुरुमाई चिद्विलासानंद



माझे दिवस तिथे व्यतीत झाले, छोट्या-छोट्या गोष्टींच्या मध्ये, प्रशांतीत. आणि मी आनंदित झालो.

~ मैनुएल डी बॅरोस [१९१६-२०१४], ब्राझीलचे कवी



अंतरी अपार प्रेम आहे.
ते परम सत्य आहे.
त्याच्याच स्फुरणामुळे आपण श्वास घेतो आणि उच्छ्वास सोडतो.

प्रेमाच्या स्पंदनामुळेच प्राण संपूर्ण शरीरात गतिमान होतो.
प्रेमानेच डोळ्यांना रूपाकारांची प्रतीती करण्याचे सामर्थ्य प्रदान केले आहे.
हे निरालंब प्रेम, चिरंतन आनंद आहे.
ते सिद्धांचे धाम आहे.

~ बाबा मुक्तानंद



आपल्या जीवनाला समयाच्या काठांवर अलगदपणे असे नृत्य करू द्या
जसे पानाच्या टोकावर दव.

~ रवींद्रनाथ टागोर [१८६१-१९४१]
भारताचे बंगाली कवी



पावसामुळे न हरलेला
वाऱ्यापुढे न झुकणारा
निर्लोभी
क्रोधरहित
सदैव शांतपणे स्मितहास्य करणारा

~ कॅन्जी मियाझावा [१८९६-१९३३],
जपानी कादंबरीकार व कवी



तुम्हाला या जगाची अनुभूती त्याच रूपात होवो जसे ते आहे— भगवंताच्या हृदयात आश्रय लाभलेले.

~ गुरुमाई चिद्विलासानंद



हजार मैलांच्या यात्रेचा आरंभ एका पावलानेच होतो.

~ लाओत्सु,
चीनी तत्त्वज्ञानी व लेखक, इ. स. पूर्व सहावे शतक



हृदय-पथावर वाटचाल करा.

~ जर्मन म्हण

फार आधीच मला त्या पावलांची चाहूल लागते.

अरे जीवना, दूरवरूनच मी तुला ओळखतो.

~ फिराक गोरखपुरी [१८९६-१९८२], भारताचे उर्दू कवी

सरळ पुढे चालत राहा,
आणि लवकरच तुम्ही
परम शिवामध्ये विलीन होऊन जाल.
लल्लीने याच मार्गाचे अनुसरण केले
आणि शिवाला प्राप्त केले.

~ लल्लेश्वरी, चौदाव्या शतकातील काश्मीरी संतकवयित्री
इंग्रजी भावार्थ : गुरुमाई चिद्विलासानंद



कोळी ज्याप्रमाणे नाजूक तंतू बनवतो
आणि त्याला पुन्हा स्वतःच्या अंतरात खेचून घेतो,

ज्याप्रमाणे पृथ्वी वनौषधींना
व अनेक आरोग्यदायी झाडाझुडुपांना वाढवते,
जसे ममुष्याच्या शरीरातून केस व लव उगवतात,
तसेच त्या अक्षरापासून अर्थात् त्या अविनाशीपासून
हे अखिल विश्व, हे प्रकट जगत उत्पन्न होते.

~ मुण्डकोपनिषद १.१.७



शांतीच्या पानावर तुमचे मन विसावू द्या.
प्रेमाच्या पुष्पावर तुमची दृष्टी स्थिरावू द्या.
त्यांना तसेच राहू द्या आणि तुम्ही त्यांच्यासोबत राहा.

~ गुरुमाई चिद्विलासानंद



आकाश उंच आहे, म्हणूनच तर पक्षी मुक्तपणे भरारी घेऊ शकतात.

~ युआन लैन, आठव्या शतकातील चीनचे बौद्ध भिक्षुक



आरंभी फक्त एक बीज होते.

ते बीज अंकुरले आणि त्यातून एक रोपटे उगवले.

एका बीजाच्या गर्भातून, कोटी-कोटी वृक्ष जन्मास आले.

आणि त्यांना कोटी-कोटी फुले व फळे लागली.

हे अनंता,

हे जगव्यापी,

तू अनेक व बहुविध रूपे धारण केली आहेस.

तथापि, शेवटी, हे भगवंता, तू एकच आहेस.

~श्री शांताराम आठवले [१९१०-१९८१],

भारताचे मराठी कवी-गीतकार आणि चित्रपट निर्माता



हे अर्जुना,

मी चंद्र आहे, आकाशात गतिमान असलेले अमृतसरोवर आहे.

तिथून असीमित चंद्रकिरणांचा वर्षाव करून,

मी सर्व वनस्पतींचे पोषण करतो.

अशा प्रकारे, सर्व प्रकारची धान्ये उपजतात
जी प्रत्येक प्राण्याला अन्न प्रदान करतात.

~ ज्ञानेश्वर महाराज,
तेराव्या शतकातील महाराष्ट्र येथील भारताचे संतकवी

*Ruhe* (जर्मन) “शांती, स्थिरता, विश्रांती, निश्चलता”
हळुवार
Миру — мир (रशियन) “विश्वात शांती नांदो”
અમન (गुजराती) “अमन, गोडीगुलाबी”

तुमच्या विचाराने माझ्या विश्वात नावीन्य येते.

~ गुरुमाई चिद्विलासानंद

Mary Kawena Pukui [भाषांतर] *Olelo Noeau: Hawaiian Proverbs and Poetical Sayings* [Honolulu, HI: Bishop Museum Press, १९८३], लोकोक्ती २७५०.

रवींद्रनाथ टागोर, *The Mystic Poets* [Nashville, TN: Skylight Paths, २००४], पृ. ५२.

©२०२० एस. वाय.डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.